ePaper

# अंधारेंच्या उपस्थितीत शिवसैनिक आपसात भिडले!



वर्ष - 7 । अंक -23 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- पुण्यात अति(आ)क्रमण!
- पुणेकरांना पाणी जपून वापरावं लागणार
- बैलगाडा शर्यतीचा ऐतिहासिक निकाल बळीराजाला समर्पित!



www.mahaenews.com । शुक्रवार, दि. 19 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पुन्हा भिर्रर सुरू!

## आजचा दिवस दसरा दिवाळीसारखा आनंदाचा: खासदार डॉ. अमोल कोल्हे

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आता महाराष्ट्रातील बैलगाडा शर्यत आणि तामिळनाडूतील जल्लीकट्टूच्या आयोजनातील कायदेशीर अडथळे दूर झाले आहेत. यापूर्वी, 8 डिसेंबर 2022 रोजी या प्रकरणाची सुनावणी पूर्ण करून खंडपीठाने निर्णय राखून ठेवला होता. राज्य सरकारने याबाबत केलेला कायदा सुप्रीम कोर्टाने वैध ठरवला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या ५ सदस्यीय खंडपीठाने आज बैलगाडा शर्यतींना परवानगी दिली हा आनंदाचा आहे, म्हटलं तर समाधानाचा, अगदी दसरा – दिवाळीच्या सणासारखा दिवस आहे. त्यामुळे 'याचसाठी केला होता अट्टाहास' अशी भावना सर्वांच्या मनात आहे, अशा शब्दांत खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी आपल्या भावना व्यक्त करीत सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानले. तसेच हे संपूर्ण यश तमाम बैलगाडा मालक, शौकिनांचे असल्याचे त्यांनी सांगितले.**





सुप्रीम कोर्टाच्या निकालानंतर शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. यावर शिरुर लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. याबाबत कोल्हे यांनी लोकसभेत हा विषय मांडला होता.

"बैलगाडा शर्यती हा शेतकऱ्यांचा आवडीचा खेळ असून शेतकरी मुलांप्रमाणे बैलांवर प्रेम करतात. देशी गाईंचा वंश टिकवून ठेवण्यासाठी बैलगाडा शर्यत सुरू होणे गरजेचे होते. ग्रामीण भागातील अर्थकारणही त्यावर अवलंबून असते, अशी प्रतिक्रिया अमोल कोल्हे यांनी दिली आहे.सुप्रिम कोर्टाच्या निकालावर कोल्हे यांनी आनंद व्यक्त केला आहे. "आघाडीच्या काळात याबाबत पुढाकार घेतला होता. बैलगाडा शौकीनांचे हे यश आहे," असे कोल्हे म्हणाले. न्यायमूर्ती केएम जोसेफ, अजय रस्तोगी, अनिरुद्ध बोस, हृषिकेश रॉय आणि सीटी रविकुमार यांचे 5 न्यायाधीशांच्या घटनापीठाने हा निकाल दिला आहे.सन 2011 मध्ये केंद्र सरकारने बैलांचा समावेश अशा प्राण्यांच्या यादीत केला ज्यांच्या प्रशिक्षणावर आणि प्रदर्शनावर बंदी आहे. यानंतर प्राण्यांचे संरक्षण करणाऱ्या पीपल फॉर एथिकल ट्रीटमेंट ऑफ ॲनिमल्स (पेटा) या संस्थेने जल्लीकट्टू खेळावर बंदी घालण्याची मागणी केली. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले.2014 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने या गेमवर बंदी घातली होती. यानंतर तामिळनाडू सरकारने हा खेळ सुरू ठेवण्यासाठी केंद्राकडे अध्यादेश आणण्याची मागणी केली. 2016 मध्ये केंद्र सरकारने एक अधिसूचना जारी करून काही अटींसह जल्लीकट्टू आयोजित करण्याची परवानगी दिली होती. उदाहरणार्थ, संपूर्ण स्पर्धेची व्हिडिओग्राफी असेल.

## बैलगाडा शर्यतीचा ऐतिहासिक निकाल बळीराजाला समर्पित! भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या भावना »पान 3

> आनंद आहे, तेवढीच जबाबदारीची जाणीव आहे. त्यामुळे पुढील काळात सर्व नियम, अटी-शर्ती पाळून दिमाखाने बैलगाडा शर्यतींचे आयोजन होईल.भल्याभल्यांना वाटत होतं की, बैलगाडा शर्यतींना परवानगी मिळणार नाही. परंतु मी पहिल्यापासून ठामपणे व आत्मविश्वासाने सांगत होतो की या सगळ्यासाठीचे एक नॅरेटिव्ह महत्वाचे आहे. त्यामुळे ज्या पद्धतीने हा लढा लढला पाहिजे, नव्याने मांडणी केली पाहिजे या माझ्या मतावर बैलगाडा मालक शेतकऱ्यांनी अगदी मनोमन विश्वास ठेवला. त्याला महाविकास आघाडी सरकार तसेच सध्याच्या सरकारने, यंत्रणांनी साथ दिली त्यांचा मी ऋणी आहे.
>
> -डॉ. अमोल कोल्हे, खासदार

## पेढा भरवून जल्लोषात आनंद साजरा

» सर्वोच्च न्यायालयाचा निकाल जाहीर होताच आज बैलगाडा मालक शेतकऱ्यांनी नारायणगाव येथील जनसंपर्क कार्यालयात उपस्थित असलेल्या खासदार डॉ. कोल्हे यांना पेढा भरवून जल्लोषात आनंद साजरा केला. यावेळी ते म्हणाले की, . विशेषतः गिरीराज सिंह यांनी खूपच सहकार्य केले त्यांचे आणि पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवारसाहेब, गटनेत्या खासदार सुप्रियाताई सुळे यांचेही मार्गदर्शन लाभले, त्यांचेही मी मनापासून ऋण व्यक्त करतो. तसेच अनेक वर्षे सातत्यपूर्ण लढा देणाऱ्या बैलगाडा मालकांचे व सहकार्य करणाऱ्या प्रत्येकाचे खासदार डॉ. कोल्हे यांनी आभार मानले.

## बैलगाडा शर्यतींवर चित्रपट बनवणार

» बैलगाडा शर्यतींवर लवकरच आपण चित्रपट बनवणार असल्याचे सांगून त्याची तयारी आधीपासूनच सुरू झाली असल्याचे खासदार डॉ. कोल्हे यांनी सांगितले. बैलगाडा मालकांचे कष्ट, त्यांचं बैलांशी असलेलं नातं या सगळ्याचा उहापोह यात असेल त्याचबरोबर एक आंतरराष्ट्रीय दबावतंत्र या बैलगाडा शर्यतींसंदर्भात वापरलं जातं ही बाब गेली ४ वर्ष संसदेत हा विषय मांडताना फार जवळून बघतोय. या आंतरराष्ट्रीय दबावाचा बुरखा फाडणारा हा चित्रपट लवकरच मायबाप प्रेक्षकांच्या भेटीला येईल असे खासदार डॉ. कोल्हे यांनी सांगितले.

# पुण्यात अति(आ)क्रमण!

## लोकप्रतिनिधी अन् अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने फोफावले विक्रेते

| पुणे | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**शहरातील अतिक्रमणे आणि त्यावर होणारी कारवाई हा कायमच चर्चेतील विषय ठरला आहे. महापालिकेतील लोकप्रतिनिधी आणि अधिकारी या दोघांच्या सोयीनुसार अतिक्रमणांवर कारवाई होते आणि या दोन्ही यंत्रणांच्या आशीर्वादानेच अतिक्रमणांना 'अभय' मिळते. नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही कारवाईचा 'फार्स' केला जातो अन् अतिक्रमणांची गाडी फिरून गेली, की पुन्हा सर्वच रस्ते-चौकांत फेरीवाले-विक्रेत्यांच्या गाड्या 'जैसे थे'च असतात.**



'राष्ट्रीय फेरीवाला कायद्या'तील तरतुदींनुसार, पुणे महापालिकेने सर्वप्रथम सर्व फेरीवाले आणि पथारी व्यावसायिकांचे 'बायोमेट्रिक सर्वेक्षण' सुरू केले. अजूनही हे सर्वेक्षण सुरूच असून, विविध ठिकाणी अनधिकृतरीत्या जागा अडवणाऱ्यांना अधिकृत करून घेण्यासाठी त्याचा उपयोग लोकप्रतिनिधी आणि पालिकेतील अधिकाऱ्यांकडून सुरू आहे. शहरात फिरताना काही वर्षांपूर्वी एखाद्या ठिकाणी एकही फेरीवाला किंवा विक्रेता दिसून न येणाऱ्या ठिकाणी आता पाच ते सहा विक्रेते सर्रास दिसून येतात. पूर्वी चार विक्रेते असलेल्या ठिकाणच्या विक्रेत्यांची संख्या आता दुप्पट किंवा त्याहून अधिक झाली आहे. सर्वसामान्य नागरिकांना या गोष्टी दिसतात, तर मग महानगरपालिकेत काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना ही वाढती अतिक्रमणे दिसत नाहीत का? गेल्या वर्षीपर्यंत नागरिकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींना नव्याने होणारी अतिक्रमणे जाणवत नाहीत का? करोनानंतरच्या काळात तर जवळपास सर्व शहरच या अतिक्रमणांनी वेढले गेले असून, नगरसेवक-अधिकाऱ्यांत साटेलोटे असल्यानेच 'ही व्यवस्था अशीच चालणार,' असा समजच नागरिकांनी करून घेतला आहे. त्यामुळे स्वतःच्याच घरातून बाहेर पडण्यासाठी एका ज्येष्ठ संशोधक महिलेला वारंवार विनंतीवजा आर्जव करावे लागते; तरीही त्यावर कारवाई केली जात नाही, ही पुण्याची खरी शोकांतिका झाली आहे.

### कसे वाढतात विक्रेते?

बालगंधर्व रंगमंदिराकडे जाणाऱ्या विठ्ठल रामजी शिंदे पुलावर अनेक वर्षांपासून केवळ एक वडा-पाव विक्रेत्यांची हातगाडी होती. त्यांचे सर्वेक्षण झाले होते. त्यानंतर काही वर्षांनी अंडाभुर्जी, चहा विक्रेता, नीरा-सरबत आणि इतर काही गाड्या तेथे लावण्यास सुरुवात झाली. टप्प्याटप्प्याने हे सर्व विक्रेते अधिकृत झाले. आता गेल्या एक-दोन वर्षांत येथील हातगाडी विक्रेत्यांची संख्या आणखी वाढली आहे. आणखी एक-दोन वर्षांत पुलाची एक संपूर्ण बाजू विक्रेत्यांनी व्यापल्याचे दिसल्यास नवल वाटायला नको. काही महिन्यांत येथील मेट्रोचे स्टेशन सुरू झाल्यानंतर तर निश्चितच आणखी विक्रेते वाढतील अन् ते अधिकृत होतील. हे विक्रेते अचानक कुठून आले, त्यांना कोणी आणून बसवले, त्यांना अधिकृत कोणी केले, त्यांच्यावर कारवाईचा दिखावा कसा होतो या सर्व गोष्टी नागरिकांना उमगतात; पण महापालिकेसारख्या महाकाय व्यवस्थेशी लढा देण्याचे बळ त्यांच्यात नसते. त्यामुळे पालिकेचे अधिकारी आणि लोकप्रतिनिधींचे फावते.

### डबल ढोलकी

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत अनेकदा सत्ताधारी पक्षाच्या विरोधात आवाज उठवण्यासाठी सर्वपक्षीय विरोधक अतिक्रमणांवर कारवाई होत नाही, शहरात बजबजपुरी झाली आहे, असे आरोप करतात. अतिक्रमणप्रमुखांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले जाते? त्याच वेळी एखादी जोरदार कारवाई झाली, तरी पुन्हा सत्ताधाऱ्यांनी सर्वसामान्यांवर, हातावर पोट असणाऱ्यांवर अन्याय केला, अशी उलट टीका केली जाते.

### कोट्यवधींची आर्थिक गणिते

**शहराच्या विविध भागांत हे फेरीवाले-विक्रेते 'मॅनेज' करणारा एक 'भाई-दादा' तयार झाला आहे. तो प्रत्येकाकडून 'हप्ते' बांधून घेतो. किती जणांना परवानगी द्यायची, कोणी नवीन एखादा आला, तर त्याच्याकडून किती पैसे घ्यायचे, अतिक्रमण कारवाई होण्याआधीच संबंधित विक्रेत्यांना टीप कशी पोहोचवायची, यात हे 'भाई-दादा' माहीर होतात. त्यांना मिळणाऱ्या रकमेपैकी काही हिस्सा त्यांची गुजराण चालवण्यासाठी ठेवून बाकीचे हिस्से संबंधित भागातील महापालिकेचे अधिकारी आणि अर्थातच काही नगरसेवक-माजी नगरसेवकांपर्यंत पोहोचवले जातात. शहरात वर्दळीच्या ठिकाणी आणि त्यातही शनिवार-रविवारी होणारी आर्थिक उलाढाल काही कोटी रुपयांत आहे. आपण ठरावीक रक्कम दिल्याने आता कारवाई होणार नाही, अशी समजूत केलेल्या विक्रेत्यांवर अचानक कधी तरी कारवाई होते आणि मग त्या रागातूनच अतिक्रमण पथकावर हल्ला करण्यासारख्या घटना घडतात, हे वारंवार दिसून येत आहे.**

# त्र्यंबकेश्वर प्रकरणानंतर संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यातील परंपरा चर्चेत!

## दरवर्षी तुकाराम महाराजांची पालखी अनगडशाह बाबांच्या दर्ग्यावर

| पिंपरी| महाईन्यूज |

**त्र्यंबकेश्वर मंदिर धूप दाखवण्याच्या प्रथेविरुद्ध हिंदुत्ववादी संघटनांनी आक्षेप घेतल्याने राज्यातील सामाजिक वातावरण ढवळून निघाले आहे. तसेच राज्य सरकारने या प्रकरणाची दखल घेत ही प्रथा चालवणाऱ्या लोकांवर पोलिसांना गुन्हे दाखल करून घेण्याचे आदेश दिले होते. त्र्यंबकेश्वर मंदिर प्रकरणानंतर काही काळ तणाव निर्माण झाला होता. मात्र, केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात शेकडो ठिकाणी हिंदू मुस्लीम सौदार्हाच्या प्रथा परंपरा चालू असून जगद्गुरू संत तुकाराम महाराज आणि मुस्लीम संत अनगडशाह बाबा यांच्यातील मैत्री परंपरा पुन्हा चर्चेत आली आहे.**

### काय आहे ही परंपरा?

आषाढी वारी सोहळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. संत तुकाराम महाराज पालखी सोहळा १० जून रोजी पंढरपूरकडे रवाना होणार आहे. या पालखी सोहळ्यात तुकाराम महाराजांची पालखी देहू गावच्या अनगडशाहबाबा दर्ग्यापर्यंत खांद्यावरती उचलून नेली जाते. त्यानंतर देहू वरून अभंग आरतीनंतर पालखी रथात ठेवून पुढे मार्गस्थ होते.अनगडशाह बाबा आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याची चारशे वर्षांची परंपरा आहे. हिंदू-मुस्लिम समाजाची एकता, सलोखा, समता, बंधुभाव, आणि एकात्मतेच्या पाऊलखुणांचे प्रतीक म्हणून ही प्रथा देहूत आजही जपली जाते.

### काय आहे या परंपरेचा इतिहास?

**अनगडशाह बाबा आणि संत तुकाराम महाराज यांच्यात मैत्रीचे नाते असल्याचे मानले जाते. जगद्गुरू तुकाराम महाराजांची विठ्ठराया प्रती असलेली अजोड भक्ती, आसक्ती आणि महाराजांचा दानशूरपणा यामुळे या मुस्लीम संतांनी जगद्गुरू तुकाराम महाराजांसह सौहार्द प्रस्थापित केलं . तुकाराम महाराजांच्या भेटीसाठी अनगडशहा बाबा पुण्यातून देहूत आले होते. हिंदू मुस्लीम ऐक्याचं आणि सर्व भावनांच्या पलिकडे जाणारं आध्यात्म आहे. त्यामुळे आजही संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे देहूतून प्रस्थान झाल्यानंतर, पहिला विसावा हा अनगडशाह बाबांच्या दर्ग्यातच घेतला जातो. आजही या ऐक्याचे प्रतीक म्हणजे या दर्ग्याच्या पुजाऱ्याचा मान हिंदुधर्मीय मुसुगडे कुटुंबाकडे आहे. मुसुगडे कुटुंबाची तिसरी पिढी अनगडशाह बाबांची सेवा करत आहेत.**

# पुणेकरांना पाणी जपून वापरावं लागणार

| पुणे | महाईन्यूज | प्रतिनिधी|



यंदा सर्वसाधारण पाऊस होण्याचा; तसेच पावसाळ्यात 'एल निनो' सक्रिय होण्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने आजपासून दर गुरुवारी शहराचा पाणीपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. शुक्रवारी पाणीपुरवठा सुरळीत राहावा, यासाठी महापालिका प्रशासनाने २० एअर व्हॉल्व्ह बसविण्यासोबतच गुरुवारी रात्री दहा वाजता जलशुद्धीकरण केंद्रातील टाक्या भरण्याचे नियोजन केले आहे. दिवसभर पाणीपुरवठा बंद राहिल्यास दुसऱ्या दिवशी जलवाहिन्यांमध्ये निर्माण होणाऱ्या हवेच्या दाबामुळे शहरातील अनेक भागांमध्ये पाणीपुरवठा विस्कळीत होतो. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने जलवाहिनीतील हवा काढण्यासाठी २५हून अधिक ठिकाणी एअर व्हॉल्व बसविले आहेत. यासोबतच शुक्रवारी बाणेर, बालेवाडी, शिवणे, हडपसर, साडेसतरानळी, सुखसागरनगर, भवानी पेठेतील चुडामण तालीम परिसर आदी ठिकाणी पाणी पुरवठ्याच्या अधिक तक्रारी असतात. तेथील नागरिकांना टँकरने पाणी पुरवण्याचे आदेश संबंधित क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आले आहेत.

# बैलगाडा शर्यतीचा ऐतिहासिक निकाल बळीराजाला समर्पित!

## भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या भावना

### देशातील बैलगाडा शर्यतींना सर्वोच्च न्यायालयाची परवानगी

। पिंपरी चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशातील शेतकरी, बळीराजाच्या जिव्हाळ्याचा विषय असलेल्या बैलगाडा शर्यतींवरील बंदी पूर्णत: उठवण्याचा ऐतिहासिक निकाल सर्वोच्च न्यायालयाने घेतला आहे. हा निकाल शेतकरी, भूमिपूत्र आणि गाडामालकांसह बळीराजाला समर्पित आहे, अशा भावना भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या. बैलगाडा शर्यतीवरील बंदी उठवण्याबाबत सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू होती. वर्षभरापूर्वी न्यायालयाने बैलगाडा शर्यतींना सशर्त परवानगी दिली होती. मात्र, पाच न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर अंमित सुनावणी सुरू होती. काहीअंशी जिंकलेला हा न्यायालयीन लढा पूर्णत जिंकण्यासाठी देशभरातील शेतकरी, बैलगाडा मालकांच्या नजरा या निकालाकडे लागल्या होत्या.**



दरम्यान, महाराष्ट्रातून बैलगाडा शर्यतीसाठी जनआंदोलन उभारण्यासाठी अखिल भारतीय बैलगाडा संघटनेच्या माध्यमातून आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे राज्य सरकारने बैलगाडा शर्यत सुरू करण्याबाबत विधिमंडळात कायदा तयार केला होता. तसेच, बैलांच्या पळण्याच्या क्षेमतेबाबत 'रनिंग ॲबिलिटी ऑफ बुल्स' हा अहवाल तयार करण्यासाठी समितीची नेमणूक केली होती. तो अहवाल सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आला. राज्य सरकारच्या कायद्यावर सर्वोच्च न्यायालयाने समाधान व्यक्त केले आहे.

> **सर्वोच्च न्यायालयात हा लढा सुरू असताना अनेक लोकांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष योगदान आणि सहकार्य केले आहे. राज्यातील बळीराजा आज खऱ्या अर्थाने आनंदोत्सव साजरा करणार आहे. बैलगाडा शर्यत हा केवळ खेळ नाही, तर आपली महाराष्ट्रातील ग्रामीण संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे. या लढ्यात सर्वाधिक योगदान देणारे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अखिल भारतीय बैलगाडा संघटनेचे सर्व पदाधिकारी, बैलगाडा शौकीन आणि गाडाप्रेमींचे मी अभिनंदन करतो. या पुढील काळात हा महाराष्ट्राचा उत्सव अत्यंत दिमाखात साजरा करुया आणि शेती-माती- संस्कृतीसाठी कटिबद्ध राहुयात.**
>
> **- महेश लांडगे,**
>
> **शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंरी-चिंचवड.**

विशेष म्हणजे, अखिल भारतीय बैलगाडा संघटना आणि महाराष्ट्र राज्य सरकार अशा दोन याचिका सर्वोच्च न्यायालयात होत्या. महाराष्ट्र सरकारच्या वतीने तज्ञ वकीलांची नियुक्ती केली होती. तसेच, बैलगाडा संघटनांच्या वकीलांचा मोठा खर्चही तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वत: वैयक्तीक करण्याची भूमिका घेतली होती. गेल्या ११ वर्षांच्या लढ्यानंतर अखेर सर्वोच्च न्यालयात बैलगाडा शर्यतीवरील बंदी पूर्णत: काढण्यात आली असून, शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा खेळ कायमस्वरुपी सुरू राहण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, अशी माहिती बैलगाडा संघटनेचे संदीप बोदगे यांनी दिली.

---

# मावळ तालुक्यातील विविध विकास कामांचा धडाका!

## खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते तीन कोटींच्या कामांचे भूमीपूजन

। मावळ । महाईन्यूज ।

**मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्या यांच्या प्रयत्नातून मावळ तालुक्यातील विविध गावासाठी जिल्हा वार्षिक नियोजना अंतर्गत तीन कोटी रूपयांची विविध विकास कामे सुरु केली आहेत. साते, कान्हे, कामशेत, टाकवे, कार्ला, मळवली, पाटण येथील गावांमध्ये विकास कामांचे भूमिपूजन खासदार बारणे यांच्या हस्ते करण्यात आले. खासदार बारणे यांनी सर्वाधिक निधी मावळसाठी दिला असून विकासकामांचा धडाका सुरु आहे.**



माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख शरद हुलावळे, तालुका प्रमुख राजेश खांडभोर, पंचायत समितीचे माजी सभापती गुलाब म्हाळसकर, अंकुश देशमुख, सुनील हगवणे, प्रवीण चव्हाण, सुनील मोरे, विशाल हुलावळे, दिपक हुलावळे, सागर हुलावळे, धनंजय नवघणे, गिरीष सातकर, डॉ. विकेश मुथा, दत्ता केदारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे जे. डी. पाटील,साते गावच्या सरपंच आरती आगळमे, कान्ह्याचे सरपंच विजय सातकर, टाकवेचे सरपंच राकेश डमाले, मळवलीचे सरपंच अस्लम शेख, पाठवचे सरपंच प्रवीण तिकोने, कामशेतचे उपसरपंच दत्ता रावते उपस्थित होते. खासदार श्रीरंग बारणे यांचे मावळ तालुक्यावर विशेष लक्ष्य आहे. मावळ तालुका वाड्या वस्त्यांमध्ये विस्तारला आहे. त्यामुळे अनेक गावांमध्ये दळणवळणासाठी रस्त्यांचा अभाव आहे. अंतर्गत रस्ते नाहीत.

त्याकरिता खासदार बारणे यांनी जिल्हा वार्षिक निधीतून मावळ तालुक्यात तीन कोटींचा निधी मंजूर करुन घेतला. या विकास निधीतून अंतर्गत रस्ते, समाज मंदिराच्या कामांचे भूमीपूजन करण्यात आले. खासदार बारणे यांनी मावळ तालुक्याला सर्वाधिक निधी दिला आहे.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, मावळातील गावांमध्ये रस्ते करण्यावर लक्ष्य केंद्रित केले आहे. ग्रामस्थांच्या मागणीनुसार मावळातील अनेक गावांमधील अंतर्गत रस्ते करण्यास प्राधान्य दिले. केंद्र, राज्य स्तरीय रस्त्यांच्या कामासाठी मोठा निधी आणला आहे. त्यातून गावांमध्ये रस्त्यांची कामे केली जात आहेत. गावपातळीवर राजकारणविरहित कामे केली जात आहेत.

### गावपतळीवर राजकारण विरहित काम करावे

» गावातील विकासांमध्ये राजकारण आणले जात नाही. सरपंच कोणत्या पक्षाचा आहे हे बघितले जात नाही. सर्व गावांना विकासासाठी समान निधी दिला जात आहे. ग्रामपंचायतीमधील सर्वांनी राजकारणापेक्षा एकत्र येवून गावाचा विकास करण्यावर भर द्यावा. गावपतळीवर राजकारण विरहित काम करावे. त्यामुळे गावाच्या विकासाला अधिक चालना मिळेल, असे मार्गदर्शनही त्यांनी केले.

# नवनव्या तंत्रज्ञानाने नेट जीवींची कासावीस!




नवनव्या तंत्रज्ञानाने मानवाचे जीवन अधिक सुसह्य करण्यासाठी आपल्या सभोवताल आणि घरातही असंख्य सुविधा निर्माण केल्या आहेत. त्या सुविधांचा वापर सुरुवातीला कुणालाही करता येत नाही ,हाताळणी सहज नसते ,मात्र मानवाची जिज्ञासा त्याला शांत बसू देत नसते ,काहीतरी खटपट केल्यावर मोबाईल,इंटरनेट,वाशिंग मशीन,म्युझिक सिस्टम,अँड्रॉइड टीव्ही ,लॅपटॉप किंवा इलेक्ट्रॉनिक गॅजेट याना हाताळण्याची कला एकदा सगळ्यांना अवगत होते. सगळे विश्व ज्यात सामावले आहे अश्या मोबाईलच्या असंख्य तऱ्हा लोक हाताळत असतात. अगदी तीन हजार ते तीन लाखापर्यंत मोबाईल हँडसेट सध्या बाजारात उपलब्ध आहेत. आपापल्या आर्थिक कुवतीनुसार सर्व स्तरातील लोक त्याचा वापर करायला लागले आहेत. त्याच्या वापरावरून अलीकडे श्रीमंती कळणे कठीण झाले आहे. धनाढ्य व्यक्ती साधा बटणाचा तर अगदी भिकारी पण आयफोन जवळ बाळगताना दिसतो.

तुमच्या हातातील गॅझेट ,तुमच्या वापरासाठी असताना ते तुमचा वापर कधी करायला लागतात याचा पत्ताही लागत नाही. गेल्या काही वर्षात मोबाईलचा वापर आणि मोबाईल तुमचा करीत असलेला वापर या दोन भिन्न बाबीकडे बारकाईने लक्ष दिले तर असे लक्षात येते की मोबाईल आपल्यासाठी नव्हे जणू मोबाईलसाठी आपण तत्पर असतो. जे लोक सोशल मीडियाचा अतिरेकी वापर करतात त्यांना तर जहाल व्यसन लागल्याचे लक्षात येते. गेल्या पाच वर्षात अँड्रॉइड मोबाईल मध्ये वापरता येणारे किमान दीडलाख ॲप्स प्ले स्टोअर्सवर उपलब्ध आहेत. ज्यांना त्यातले काहीतरी कळते ते सतत विविध ॲप्सचा उपयोग असंख्य कामांसाठी करीत असतात. संगीत,कला,अभिनय,धर्म,अध्यात्म , कथा,कविता असे लाखो पर्याय लोकांना उपलब्ध करून देण्यात आले आहेत. एखाद्याला अमर्याद नेट उपलब्ध करून दिली तर त्याच्या जीवनातील काही वर्ष अशीच निघून जातील पण ॲप्स काही संपणार नाहीत.

असंख्य ॲप्सचे गाठोडे असणारा मोबाईल आपली झोप कधी उडवतो हे लक्षात येत नाही. दर मिनिटाला मोबाईल उघडून बघणारे महान लोक आपल्याच कुटुंबात असतात.



चहा,दारू,तंबाखूच्या जोडीला मोबाईल आपले व्यसन कधी होऊन बसते हे कळत नाही. काही महाभाग संडासात सुद्धा मोबाईलची साथ सोडायला तयार नसतात. एखाद्या गॅझेटच्या आहारी जाणे म्हणजे दुसरे काय असते. परवा अकोल्यातील घटनेमुळे प्रशासनाने दोन दिवस इंटरनेट सेवा बंद केली होती त्या दोन दिवसात हे सगळे नेटजीवी एवढे कासावीस झाले की खायला एकवेळ नका देऊ पण नेट सुरु ठेवा अशी तडजोड करायला हा वर्ग तयार होता. इंग्रजांनी फुकटात चहा पाजून भारतीयांना असेच दिवाने करून सोडले आहे ,आज त्याचे भयंकर व्यसनात रूपांतर झाले आहे की लोक दूध नसेल तर काळे गरम पाणी मोठ्या आनंदाने पितात,दुधाशिवाय पिण्याच्या शेकडो रेसिपी चहा शौकिनांनी तयार केल्या आहेत.

व्यसन केवळ पोटात जाणाऱ्या पदार्थाचे लागू शकते असे नाही. व्यसनाचा संबंध आपल्या मेंदूशी असतो ,नजरेने बघून मेंदूत तयार होणारी रसायने आपल्याला किती उद्दीपित करतात यावर बरेच काही अवलंबून असते. पॉर्न व्हिडीओ बघताना कुतूहल म्हणून पुन्हा काहीवेळा त्याच्या वाटेला गेलेले तरुण न कळत त्याच्या आहारी जातात आणि पुढे त्यातून नव्या विकृती डोक्यात जन्माला येतात त्याच पद्धतीने मोबाईलचे व्यसन जडते. तासभर स्क्रीन बघितला नाही तर जीव कासावीस होतो,प्रचंड ओढ तयार होते ,डोके गरगरायला सुरुवात होते . मित्रहो व्यसनाची आणखी काय वेगळी लक्षणे असतात ? आपल्यासाठी मोबाईल किंवा ही गॅझेट्स आहेत आपण त्यांच्यासाठी नव्हे हे कायमचे जे लोक लक्षात ठेवतात आणि तसे वागतात त्यांच्यावर व्यसने आरूढ होताना हजारदा विचार करतात हे लक्षात घ्या. काही नवे करण्याची गरज नाही केवळ नव्याने काही गोष्टी सुरु करा.

इलेक्ट्रॉनिक गॅझेट मध्ये " स्वीचऑफ " नावाची संकल्पना काम करते. एखादे गॅझेट " हँग " झाले तर त्याला बंद काहीवेळ बंद करणे हाच एकमेव पर्याय असतो. तसेच आपलेही असते मेंदूत विचारांचा अनेकदा कल्लोळ होतो,एकाचवेळी अनेक फ्लोपी ओपन असतात ,टॅन आला की मेंदू हँग होतो अशावेळी स्वतःला " स्वीचऑफ " करणे जमायला हवे. एकांत किंवा मनाला उभारी देणारी जागा म्हणूनच आपण शोधत असतो ,पूर्वीच्या काली ध्यान धारणा या माध्यमातून त्यावर तात्पुरता उपाय पूर्वजांनी शोधला होता. आता स्वतःला " स्वीचऑफ " करून पडून राहणे आपण सुरु केले आहे. माणूस आणि गॅझेट्स दोघांनाही काहीवेळ " स्वीचऑफ" होणे आवश्यक झाले आहे. झोपेतून उठल्यावर किती तासांनी मोबाईल नावाचे संकट हातात घ्यायचे हे आता प्रत्येकाने आपापल्या गरजेनुसार ठरवून टाकले पाहिजे तरच जीवाची घालमेल आणि मानसिक अनारोग्य थांबण्याची शक्यता आहे.

## संपादकीय »

### लाखाचे बारा हजार..!

***आयुर्विमा महामंडळाकडे व्यावसायिक व्यवस्थापनाची वानवा नाही, मात्र सरकारच्या सूचनावजा आदेशांना जुमानू नये इतकी स्वायत्तताही नाही हेही तितकेच खरे.***

कार्यभाग कसाबसा उरकला गेला की त्यातून चांगले काही घडलेले दिसेल या अपेक्षेला मुरड घालणेही ओघाने आलेच. मोठी समृद्धी आणि अर्थ-लौकिक असलेले भारतीय आयुर्विमा महामंडळ अर्थात एलआयसी आणि तिचे गुंतवणूकदार नेमका याचाच अनुभव सध्या घेत आहेत. बाजारच झोपला असताना प्रारंभिक समभाग विक्रीचा न पेलवणारा उपचार उरकला गेला आणि आज समभागांच्या सूचिबद्धतेला वर्ष उलटल्यावरही भागधारकांनी हात चोळत बसावे अशी ही एकंदर स्थिती आहे. आयुर्विमा महामंडळातील गुंतवणुकीचे मूल्य किती घसरले याचा हिशेब येथे मांडायचा हेतू नाही. समभागांच्या किमतीत वर्षभरात निरंतर सुरू राहिलेली घसरण पाहता, ज्याचा त्याला तो मांडता येणे सहज शक्य आहे. शिवाय कोणी म्हणेल की, हे नुकसान तूर्त अनुमानितच आणि सबुरीने घेतले तर पुढे जाऊन ते लाभात परिवर्तित होईलदेखील. पण या तांत्रिक बाबी बाजूला केल्या तरी प्रश्न उरतोच की, हे नुकसान का, कशामुळे आणि नेमके कुणाचे?

**अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) छत्तीसगड या काँग्रेसशासित राज्यात चालविलेली मद्यविक्रीतील घोटाळ्याची चौकशी तत्त्वत: चूक नाही. कोणत्याही घोटाळ्यातून करचोरी होऊ नये आणि सामान्य नागरिकांच्या घामातून जन्म घेणारा पैसा काळवंडू नये, ही अपेक्षाही चूक नाही.**

### कायद्याच्या राज्याची नैतिकता!

करचोरी आणि दारूच्या दुकानांच्या परवान्यांचे वाटप होत असताना काही आर्थिक गैरप्रकार होत असतील, तर ते धनधुलाईच्या विरोधात झालेल्या कायद्यांमध्ये येतात आणि त्यामुळे ‘ईडी’ला तेथे कारवाई करण्याचा अधिकार पोहोचतो, याचाही निर्वाळा न्यायसंस्थेने दिला आहे. असे असूनही ‘उगाच भीतीचे वातावरण तयार करू नका,’ असा इशारा खुद्द सर्वोच्च न्यायालयाला ‘ईडी’ला द्यावा लागला आहे. यावरून, करचोरीची कारवाई करताना ‘ईडी’ने नेहमीची चौकट ओलांडून अतिउत्साह दाखविला का किंवा छत्तीसगडमध्ये काँग्रेसचे सरकार असल्याने आपल्या कारवाईचा राजकीय लाभ होईल, अशा प्रकारे वर्तन केले का, असे प्रश्न निर्माण होतात. सध्या सर्वच राज्यांचे कारभार सारखेच चालतात. कोणत्याही पक्षाची राजवट असली, तरी टक्केवारीत फरक पडत नाही. उलट ती वाढत जाते. विशेषत: दारू दुकानांचे परवाने, त्यांच्यावरची करआकारणी आणि दारूची बेकायदा विक्री या बाबतीत देशात कुठेही पारदर्शकता नाही; त्यामुळे दर काही काळाने दारूबाबत काही ना काही घोटाळे होतच असतात. सध्या दिल्लीतील आम आदमी पक्षाचे सरकारही दारूदुकानांच्या परवान्यांमुळेच अडचणीत आले आहे. केंद्रीय यंत्रणांनी अशा गैरव्यवहारांवर कारवाई करताना पक्षीय दृष्टी ठेवू नये आणि आपली व्यावसायिक नीतिमत्ता शाबूत ठेवावी, अशी अपेक्षा न्यायसंस्था, समाज व माध्यमे यांनी ठेवली, तर ती चूक म्हणता येणार नाही. मात्र, सध्याचे चित्र तसे नाही. छत्तीसगड सरकारला सर्वोच्च न्यायालयात धाव घ्यावी लागण्याचे एक कारण म्हणजे, राज्यातील अधिकाऱ्यांचे या मद्यविक्री आणि परवाने प्रकरणात सुरू झालेले अटकसत्र. राज्याच्या अबकारी खात्यातील विशेष सचिव अरुण त्रिपाठी यांना ‘ईडी’ने परवाच अटक केली आहे. हे त्रिपाठी राज्याच्या पणन महामंडळाचेही व्यवस्थापकीय संचालक आहेत. दोषी अधिकाऱ्यांवर इतकी कडक कारवाई करायलाही काहीच हरकत नाही. मात्र, आमच्याकडून कधी कधी कोऱ्या,



तर कधी आधीच टंकलिखित केलेल्या कागदपत्रांवर केंद्रीय यंत्रणा सह्या घेत आहेत, अशी तक्रार सर्वोच्च न्यायालयात होत असेल, तर ती बाब अतिशय गंभीर आहे. हा मद्यघोटाळा दोन हजार कोटी रुपयांचा असल्याचे सांगितले जाते. ‘ईडी’ने गेल्या काही दिवसांत या प्रकरणात अनेक छापे तर टाकलेच; शिवाय अनेक संशयितांना अटकही केली आहे. राज्यात दारूचे खासगी दुकान काढायला अनुमतीच नाही आणि सगळी आठशे दुकाने राज्य सरकारच्या अखत्यारीत येतात. त्यामुळेच, दारूचा बेकायदा व्यापार होत असल्याचा संशय होता. ‘ईडी’ने आजवर ज्यांना अटक केली आहे, त्यात काँग्रेसचे नेते आणि रायपूरचे महापौर अय्याज ढेबर यांचे बंधू अन्वर ढेबर यांचाही समावेश आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# रिफायनरीमुळे बारसू येथील 170 कातळशिल्पे धोक्यात!

## जैवविविधतेलाही फटका बसण्याची भीती; कातळशिल्पांबाबत दहा वर्षे काम सुरू

।मुंबई। महाईन्यूज। प्रतिनिधी।

**राजापुरातील बारसू येथील सडय़ावर मोठय़ा प्रमाणात कातळशिल्पे आहेत. त्यामुळे बारसूमध्येच तेलशुद्धीकरण प्रकल्प उभारल्यास सुमारे १७० कातळशिल्पे धोक्यात येणार असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे प्रागैतिहासिक काळापासूनची संस्कृती दर्शवणाऱ्या गूढ कातळशिल्पांच्या जतन-संवर्धनाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.**



> कातळशिल्पांप्रमाणेच या सडा परिसरात अनेक दुर्मीळ वनस्पती आणि जैवविविधता आहे. त्यातील काही वनस्पती तर 'एंडेमिक' (केवळ राजापूर परिसरात आढळणाऱ्या) आहेत. त्यामुळे या जैवविविधतेवरही घाला येण्याची शक्यता असल्याचेही स्थानिकांनी सांगितले. बारसूच्या सडय़ावर नेमकी किती कातळशिल्पे आहेत, याचे अद्याप सर्वेक्षण झालेले नाही. त्यामुळे रिफायनरी प्रकल्प झाल्यास किती कातळशिल्पे त्यात जातील, याबाबत आताच काही बोलणे योग्य ठरणार नाही.
> – **डॉ. तेजस गर्गे,** संचालक, राज्य पुरातत्त्व विभाग

बारसू गावातील कातळशिल्पासह एकूण आठ ठिकाणची कातळशिल्पे 'युनेस्को'च्या जागतिक वारसास्थळांच्या तात्पुरत्या यादीत समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यामुळे कातळशिल्पांच्या जतन आणि संवर्धनाची आशा निर्माण झाली. मात्र, आता प्रस्तावित तेलशुद्धीकरण प्रकल्पामुळे बारसूच्या सडय़ावरील सुमारे १७० कातळशिल्पे धोक्यात असल्याचे दिसून येत आहे.

बारसू येथील कातळशिल्पांबाबत माहिती घेण्यासाठी 'लोकसत्ता'ने रत्नागिरी येथील ज्येष्ठ अभ्यासक सुधीर रिसबूड यांच्याशी संपर्क साधला. "रिफायनरी प्रकल्प एकूण सहा गावांच्या सडय़ावर होणार असल्याची प्राथमिक माहिती आहे. त्यात बारसू, सोलगाव, देवाचे गोठणे, सोगमवाडी, गोवळ, शिवणे यांचा समावेश आहे. या गावांच्या सडय़ाच्या भागाला 'राजापूर लॅटिरॅटिक सरफेस' म्हटले जाते. या परिसरात असलेल्या कातळशिल्पांबाबत गेली दहा वर्षे काम सुरू आहे. त्यामुळे या भागाचा अभ्यास केला असता, आतापर्यंत सुमारे १७० कातळशिल्पे आढळून आली आहेत. त्यातील देवाचे गोठणे या गावातील कातळशिल्प वगळल्यास अन्य गावांतील कातळशिल्पे रिफायनरीच्या प्रस्तावित जागेत येत असल्याचे दिसून येते. देवाचे गोठणे येथील कातळशिल्प 'युनेस्को'च्या तात्पुरत्या यादीतही आहे. रिफायनरी प्रकल्पामुळे धोक्यात येणाऱ्या सुमारे १७० कातळशिल्पांमध्ये युनेस्कोच्या यादीतील बारसू येथील कातळशिल्पांचा समावेश आहे. कातळशिल्पांचा अभ्यास केला असता तो परिसर तत्कालीन मानवासाठी महत्त्वाचा होता. त्यामुळे तो कालखंड समजून घेण्यासाठी कातळशिल्पे महत्त्वाची आहेत. तसेच सडय़ावरील दगड सच्छिद्र असल्याने पावसाचे पाणी भूगर्भात जाऊन विहिरींच्या माध्यमातून ते उपलब्ध

---

# वाझेंना सेवेत घेण्यासाठी उद्धव ठाकरेंकडून दबाव!

## उपमुख्यमंत्री, भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांचा गौप्यस्फोट

।पुणे। महाईन्यूज। प्रतिनिधी।

**मुंबई पोलीस दलातील निलंबित अधिकारी सचिन वाझे यांना पुन्हा सेवेत घेण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या माणसांमार्फत माझ्यावर दबाव आणला होता. मात्र, मुख्यमंत्री असताना मी त्याला नकार दिला. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर सचिन वाझे यांना पुन्हा सेवेत घेण्यात आले, असा गौप्यस्फोट राज्याचे उपमुख्यमंत्री, भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी पुण्यात केला.**



अंबानींच्या अँटिलिया निवासस्थानाबाहेर फडणवीस यांनीच स्फोटके ठेवल्याचा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. त्या संदर्भात बोलताना फडणवीस यांनी हा गौप्यस्फोट केला. पटोले यांना जाहीर पारितोषिक दिले पाहिजे, असे नमूद करून फडणवीस म्हणाले, की राज्यात भाजप-शिवसेनेची सत्ता असताना मुंबई पोलीस दलातील निलंबित अधिकारी सचिन वाझे यांना सेवेत घेण्यासाठी उद्धव ठाकरे यांच्या माणसांनी माझ्यावर दबाव आणला होता. मुख्यमंत्री असताना मी त्याला नकार दिला. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर वाझे यांना पोलीस दलात दाखल करून घेण्यात आले. सेवेत दाखल झाल्यानंतर वाझे वर्षा बंगल्यावर आणि मातोश्रीवरच कायम दिसत असत, असे फडणवीस यांनी सांगितले. मविआ'चे सरकार विश्वासघाती.. महाविकास आघाडीचे अडीच वर्षांचे सरकार विश्वासघाताचे आणि खंडणीखोरांचे होते. खंडणीखोरांपासून दाऊदपर्यंत संपर्क असलेल्या नेत्यांचा मंत्रिमंडळात समावेश होता.

---

# मराठी अधिकाऱ्यामुळे दिल्ली सरकार पुन्हा सर्वोच्च न्यायालयात

।नवी दिल्ली। महाईन्यूज। प्रतिनिधी।



सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली सरकारला सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे सर्वाधिकार दिले असले तरी राज्य सरकारचे आदेश पाळले गेले नाहीत, त्यामुळे पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा निर्णय सरकारने घेतला.

सर्वोच्च न्यायालयाने मागच्या आठवड्यातच दिल्ली सरकारला सर्व प्रशासकीय अधिकार दिले होते. सनदी अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या आणि बदल्यांचा अधिकार यामुळे राज्य सरकारला मिळाला होता. मात्र आठवड्याभरातच 'आप'च्या सरकारला पुन्हा सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठवावा लागला. याला कारण ठरले आहेत एक मराठी अधिकारी. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येताच सेवा विभागाचे सचिव असलेले आशीष मोरे यांच्या बदलीचे आदेश राज्य सरकारने दिले. मात्र हे आदेश फेटाळून आशीष मोरे आपल्या पदावर कायम होते. यानिमित्ताने दिल्ली सरकारने सर्वोच्च न्यायालयात आणखी एक याचिका दाखल केली आहे. तसेच यानिमित्ताने मराठी अधिकारी असलेले आशीष मोरे कोण आहेत? त्यांनी दिल्ली सरकारच्या आदेशाचे तात्काळ पालन का केले नाही?

# खलनायक नव्हे नायक! निळू फुले कोण होते?



मराठी सिने-नाट्यविश्वामधल्या खलनायकांबद्दल बोललं जातं तेव्हा पहिला चेहरा समोर येतो तो म्हणजे अर्थान दिवंगत अभिनेते निळू फुले यांचा. खलनायकी भूमिकांमुळं निळू भाऊ अजरामर झालेत. निळूभाऊ अभिनेते म्हणूनसर्वश्रेष्ठ होतेच पण माणूस म्हणूनही सर्वोत्कृष्ट होते. अशा या निळू भाऊंचं आयुष्य आता मोठ्या पडद्यावर प्रेक्षकांना अनुभवता येणार आहे. त्यांचा बायोपिक लकरच प्रेक्षकांच्या येणार आहे. पण पडद्यावरचा खलनायक खऱ्या आयुष्यात नायक होता. अनेक सहकलाकार त्यांच्या आठवणींत रमताना दिसतात.

### असा कलाकार होणे दुर्मीळ आहे

'एकाही पैशाची अपेक्षा न ठेवता आयुष्यभर आपल्या ध्येयासाठी झटत राहणं अत्यंत कमी व्यक्तिमत्वांना जमते. निळू फुले हे अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक होते. त्यांनी कधीही माणुसकी सोडली नाही. माणुसकीचे प्रत्येक मूल्य जपत त्यांनी आपल्यातील कलाकार घडवला, असा कलाकार होणे दुर्मीळ आहे,' अशा भावना ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती सुभाष यांनी एका कार्यक्रमात व्यक्त केल्या होत्या.

### ते भाग्यवान आहेत...


'काही माणसे त्यांच्या वागणुकीमुळे मोठी ठरतात. निळूभाऊ त्यांच्यापैकीच एक होते. त्यांच्याबरोबर मी काम केल्यानं हे ठामपणे सांगू शकते. प्रत्येक कलाकारासोबत वागण्याची त्यांची पद्धत आजही अनुकरणीय आहे. त्यांच्याबरोबर ज्या व्यक्तींनी काम केले ते भाग्यवान आहेत,' असे सांगत सुभाष यांनी निळूभाऊंच्या अनेक आठवणींना उजाळा दिला होता.

### जेव्हा राज्यात प्रचंड दुष्काळ

हा किस्सा आहे, १९७२ दरम्यानचा. जेव्हा राज्यात प्रचंड दुष्काळ होता. राम नगरकर तेव्हा निळू फुलेंच्या घरी राहत होते. सेवादलानं दुष्काळग्रस्तांसाठी गोळा केललं धान्य फुलेंच्या घरी असायचं. एकदा निळूभाऊ आणि राम नगरकर कामासाठी बाहेर निघाते होते, तेवढ्यात निळूभाऊंच्या आईनं त्यांना आवाज दिला आणि म्हणाल्या थोडे पैसे दे. यावर निळू भाऊ म्हणाले की, माझ्याकडे पैसे नाहीत. यावर त्यांची आई म्हणाली की, घरातलं धान्य संपलंय, काय करू. निळू फुले म्हणाले की, काहीही कर. त्यांची आई त्यांना गोळा केलेल्या धान्याबद्दल विचारते. यातलं पायलीभर धान्य घेऊ का असंही विचारते. पैसे आले, धान्य आणलं की, परत त्यात टाकूया, यावर निळू भाऊंनी असं काही उत्तर दिलं की, ते अनेकांसाठी प्रेरणादेणारं होतं. ते म्हणाले होते, की 'ते लोकांचं धान्य आहे.

# "मला 1 रुपया..." विजय पाटकरांनी सांगितली लक्ष्मीकांत बेर्डेंची आठवण


मराठी आणि हिंदी सिनेसृष्टीत विनोदाचा बादशहा आणि मिमिक्री आर्टिस्ट म्हणून अभिनेते विजय पाटकर यांना ओळखले जाते. विजय पाटकर यांनी ८० च्या दशकात त्यांच्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात केली. त्यांनी आतापर्यंत अभिनेता, निर्माता आणि दिग्दर्शक अशा तिन्ही क्षेत्रात काम केले आहे. सध्या ते प्रसिद्ध दिग्दर्शक रोहित शेट्टी याच्या सर्कस चित्रपटात काम करत आहे. यानिमित्ताने त्यांनी अभिनेते लक्ष्मीकांत बेर्डे यांची एक आठवण सांगितली आहे.



विजय पाटकर यांनी लक्ष्मीकांत बेर्डे यांच्याबरोबर अनेक चित्रपटात काम केले आहे. यातील अनेक चित्रपटात विजय पाटकर यांनी पोलीस पात्राची भूमिका साकारली आहे. सध्या ते सर्कस या चित्रपटाचे प्रमोशन करत आहेत. यानिमित्ताने नुकतंच त्यांनी एक मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. विजय पाटकर यांनी फार वर्षांपूर्वी एका विनोदी मालिकेचे दिग्दर्शन केले होते. या मालिकेत लक्ष्मीकांत बेर्डे हे प्रमुख भूमिकेत होते. त्या काळात विजय पाटकर यांना कामाचे पैसे देणे शक्य नव्हतं. एक दिवस विजय पाटकर हे पैशांबद्दल विचार करत बसलेले असताना लक्ष्मीकांत बेर्डे त्यांच्याकडे आले. विजय पाटकरांनी पैशाचा विषय काढण्यापूर्वीच लक्ष्मीकांत बेर्डे यांनी त्यांना चिंतामुक्त केले. मी तुझ्याकडे पैसे मागतोय का? असे त्यावेळी ते विजय पाटकरांना म्हणाले. तू जे काय देशील ते मी घेईन, जर तू मला १ रुपया दिलास तरीही मी यात काम करेन, असे त्यावेळी लक्ष्मीकांत बेर्डे विजय पाटकर यांना म्हणाले.

# एका चित्रपटामागे अक्षय घेतो 160 कोटी;

बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमारचं खर नाव राजीव हरी ओम भाटिया असे आहे. अक्षय सध्या 55 वर्षाचा असून त्याचा जन्म पंजाबच्या अमृतसर मधील एका पंजाबी कुटुंबामध्ये झाला होता. अक्षयचे शिक्षण मुंबईमध्ये झालं. 1991 साली अक्षयने सौगंध या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. त्यानंतर लागोपाठ त्याचे अनेक सुपरहिट चित्रपट प्रदर्शित झाले. सध्या अक्षय कुमार बॉलिवूडमधील सर्वाधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्यांपैकी एक आहे. तो त्याच्या एका चित्रपटामागे 160 कोटी मानधन घेतो.



अक्षयचा जुहूतील आलिशान बंगला- अक्षयचे राहते घर मुंबईतील जुहू येथे आहे. हे संपूर्ण घर भव्य आणि आलिशान असून या घराची डिझाईन अक्षयची पत्नी ट्विंकल खन्नाने केली आहे. या घराव्यतिरिक्त मुंबईतील खार येथे 7.8 कोटी रुपयांची आलिशान अपार्टमेंट आहे. तसेच त्याचे मुंबईत आणखी चार फ्लॅट आहेत. मीडिया रिपोर्ट्सनुसार, अक्षयचा मॉरिशसमधील बीचजवळ एक भव्य बंगला आहे, जिथे तो अनेकदा आपल्या कुटुंबासह सुट्टी घालवतो. याशिवाय अक्षयचा गोव्यात एक व्हिला आहे, ज्याची किंमत सुमारे 5 कोटी रुपये आहे.

अक्षय कुमार कॅनडातील टोरंटो येथे डोंगर आणि घराचा मालक

अक्षय कुमारकडे कॅनडाचे नागरिकत्व आहे. कदाचित याच कारणासाठी त्याने कॅनडामध्येही गुंतवणूक केली असावी. अक्षयने मॅपल लीफमध्ये एक आलिशान बंगला आणि काही अपार्टमेंट्स आणि टोरंटोमध्ये संपूर्ण डोंगर खरेदी केला आहे.

2008 सुरु केले स्वतःचा प्रोडक्शन हाऊस- 2008 मध्ये अक्षयने वडिलांच्या नावाने 'हरिओम प्रॉडक्शन' सुरू केले, ज्याचे नाव आता 'केप ऑफ गुड फिल्म्स' असे ठेवण्यात आले आहे. सिंग इज किंग, हॉलिडे, एअरलिफ्ट, रुस्तम आणि पॅडमॅन यासारखे काही ब्लॉकबस्टर चित्रपट या प्रॉडक्शन हाऊसने तयार केले आहेत.



# पाकिस्तानच्या 'या' करिश्मा पुढे बॉलिवूड अभिनेत्रीसुद्धा आहेत फिक्या

***सध्या वारंवार सोशल मीडियावर अशाच एका तरुणीचे फोटो आणि व्हिडीओ व्हायरल होत असतात जी अगदी हुबेहुब करिश्मा कपूर सारखी दिसतेय. या तरुणीला पाहून करिश्मा कपूरचे चाहते सुद्धा हैराण झाले आहेत.***

बॉलिवूडमध्ये असे अनेक कलाकार आहेत ज्यांच्यामुळे त्यांच्यासारखेच दिसणारे लोग प्रसिद्ध होतात. काही लोक असे आहेत, जे हुबेहुबे चित्रपटातील कलाकारांसारखेच दिसतात. आता अलीकडे सोशल मीडियाच्या वाढत्या वापरामुळे अशा अनेक लोकांना चांगलीच प्रसिद्धी मिळत आहे. सध्या वारंवार सोशल मीडियावर अशाच एका तरूणीचे फोटो आणि व्हिडीओ व्हायरल होत असतात जी अगदी हुबेहुब करिश्मा कपूर सारखी दिसतेय. या तरूणीला पाहून करिश्मा कपूरचे चाहते सुद्धा हैराण झाले आहेत.

करिश्मा कपूर सारखी हूबेहूब दिसणाऱ्या या तरूणीचे नाव हिना खान असून हि तरूणी पाकिस्तानची आहे. तसेच हि सोशल मीडियावर खूप ॲक्टिव असते. तिने शेअर केलेले फोटो आणि व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर या तरूणीचे अनेक व्हिडीओ व्हायरल होत असतात. तसेच हिनाचे अनेक व्हिडीओ करिश्मा कपूरच्या चित्रपटातील गाण्यांवर आणि डायलॉगवर असतात.

हिना खानत्या लूकबाबत सांगायला गेलं तर हिनाचे डोळे आणि केसांची रचना सुद्धा अगदी करिश्मा कपूर सारखीच आहे.याशिवाय तिचा चेहरा सुद्धा करिश्मा कपूर सारखाच आहे. तसेच हिनाचे तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर अनेक फॉलोवर्स आहेत.तर करिश्मा कपूरचेही सोशल मीडियावर लाखो चाहते आहेत. करिश्मा कपूरला ९० च्या दशकातील सुपरहिट आणि सुंदर अभिनेत्रींमधील एक मानले जाते.

# विराटने झळकावले विक्रमी शतक!

## बंगळुरूचा हैदराबादी नवाबांवर तब्बल आठ विकेट्सने विजय

। हैदराबाद ।

महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु संघाचा सामना इंडियन प्रीमियर लीगमध्ये (आयपीएल) गुरुवारी सनरायजर्स हैदराबादशी होणार असून,'प्ले-ऑफ'मधील आव्हान कायम राखण्यासाठी त्यांना या सामन्यात विजय अनिवार्य आहे.**

आयपीएल २०२३ मधील ६५ वा सामना सनरायझर्स हैदराबाद आणि रॉयल चॅलेंजर्स बंगलुरु संघात खेळला गेला आहे. या सामन्यात आरसीबीने हैदराबादचा ८ गडी राखून पराभव केला. हैदराबादने प्रथम फलंदाजी करताना हेनरिक क्लासेनने झंझावाती शतकाच्या जोरावर २० षटकांत ५ बाद १८६ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात आरसीबीने विराट कोहलीच्या दमदार शतकाच्या १९.२ षटकात १८७ धावा करत विजय नोंदवला.

आरसीबीने दणदणीत विजय मिळवत गुणतालिकेत अव्वल ४ मध्ये प्रवेश केला आहे. त्यानी आतापर्यंत १३सामने खेळले असून या कालावधीत त्याने ७सामने जिंकले आहेत. बेंगळुरूला ६सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला आहे. त्याचे १४ गुण झाले आहेत.

### कोहलीच्या शानदार शतकाच्या जोरावर विजय

विराट कोहलीने ६२ चेंडूत आपले शतक पूर्ण केले आहे. मात्र, शतक झळकावल्यानंतर पुढच्याच चेंडूवर तो बाद झाला. कोहलीने ६३ चेंडूत १०० धावांची खेळी केली. त्याने १२ चौकार आणि चार षटकार मारले. त्याचे आयपीएलमधील हे सहावे शतक आहे. त्याने ख्रिस गेलच्या शतकांच्या विक्रमांशी बरोबरी केली आहे. त्याचबरोबर कर्णधार फाफ डू प्लेसिस सोबत पहिल्या विकेटसाठी १७२ धावांची भागीदारी रचली. फाफ डू प्लेसिसनेही ४७ चेंडूत ७१ धावांचे योगदान दिले. प्लेसिसने ७ चौकार आणि २ षटकार मारले. अखेरीस ग्लेन मॅक्सवेल ५ धावा आणि ब्रेसवेल ४धावा करून नाबाद राहिला. आरसीबीसाठी सिराजने शानदार गोलंदाजी केली. त्याने ४ षटकात केवळ १७ धावा देत एक विकेट घेतली. ब्रेसवेलने २ षटकात १३ धावा देत २ बळी घेतले.

शाहबाज अहमदने ३ षटकात ३८ धावा देत १ बळी घेतला. हर्षल पटेलने ४ षटकात ३७ धावा देत १ बळी घेतला. कर्ण शर्मा आणि पारनेल यांना एकही विकेट मिळाली नाही.




### क्लासेनचे धमाकेदार शतक

**नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना क्लासेनने हैदराबादसाठी स्फोटक शतक झळकावले. चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करताना त्याने ५१ चेंडूत १०४ धावा केल्या. क्लासेनच्या खेळीत ८ चौकार आणि ६ षटकारांचा समावेश होता. यादरम्यान त्याचा स्ट्राइक रेट २०३.९२ होता. आयपीएलमध्ये शतक झळकावणारा क्लासेन हैदराबादचा चौथा खेळाडू ठरला. तत्पूर्वी, अभिषेक त्रिपाठी ११धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. ब्रेसवेलने त्याला चालायला लावले. सलामीवीर राहुल त्रिपाठी १२ चेंडूत १५धावा करून बाद झाला. ब्रेसवेलने त्रिपाठीलाही पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. कर्णधार आदिन मार्कराम २० चेंडूत १८ धावा करून बाद झाला. अखेरीस, हॅरी ब्रूक २७धावा करून नाबाद राहिला. त्याने १९ चेंडूंत २ चौकार आणि**

---

## रेयालच्या वर्चस्वाला धक्का; मँचेस्टर सिटीची अंतिम फेरीत धडक

। मँचेस्टर ।

महाईन्यूज । प्रतिनिधी।



गतविजेत्या आणि गेल्या सात हंगामांत चार वेळा चॅम्पियन्स लीग फुटबॉलचे जेतेपद पटकावणाऱ्या रेयाल माद्रिद संघाच्या वर्चस्वाला मँचेस्टर सिटीने धक्का दिला. उभय संघांमधील उपांत्य फेरीचा पहिल्या टप्प्यातील सामना १-१ असा बरोबरीत संपला होता. परंतु बुधवारी मध्यरात्री झालेल्या दुसऱ्या टप्प्यातील सामन्यात सिटीने रेयालवर ४-० असा मोठा विजय साकारला. त्यामुळे सिटीने ही लढत एकूण ५-१ अशा गोलफरकाने जिंकत चॅम्पियन्स लीगच्या अंतिम फेरीत धडक मारली.

चॅम्पियन्स लीगमध्ये रेयाल माद्रिदला नमवणे अशक्यप्राय आव्हान मानले जाते. रेयालने तब्बल १४ वेळा या स्पर्धेचे जेतेपद मिळवले आहे. मात्र, पेप ग्वार्डियोला यांच्या मार्गदर्शनाखालील मँचेस्टर सिटीने रेयालला सर्वोत्तम खेळ करण्यापासून रोखले. घरच्या मैदानावर झालेल्या दुसऱ्या टप्प्यातील सामन्यात सिटीने आक्रमण आणि बचाव या दोन्ही आघाडय़ांवर रेयालपेक्षा सरस खेळ केला. विशेषत: सिटीच्या मध्यरक्षकांनी रेयालकडे चेंडूचा फार वेळ ताबा राहणार नाही याची काळजी घेतली. पूर्वार्धात पूर्णपणे सिटीचे वर्चस्व राहिले. सुरुवातीच्या काही मिनिटांत सिटीचा आघाडीपटू अर्लिग हालँडने मारलेले दोन फटके रेयालचा गोलरक्षक थिबो कोर्टवाने अप्रतिमरित्या अडवले. मात्र, २३व्या मिनिटाला केव्हिन डीब्रूएनेच्या पासवर बर्नाडरे सिल्वाने गोल करत सिटीला १-० अशी आघाडी मिळवून दिली. बर्नाडरेनेच ३७व्या मिनिटाला सिटीची आघाडी दुप्पट केली. मध्यंतरापर्यंत सिटीने दोन गोलची आघाडी राखली.

## फ्रेंच खुल्या स्पर्धेतून राफेल नदालची माघार!

### पुढील वर्षी निवृत्त होण्याचेही संकेत

। माद्रिद ।

महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**पाकिस्तानने पुन्हा एकदा भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेचा घाट घातला. एवढेच नव्हे तर ही मालिका ऑस्ट्रेलिया, इंग्लंड किंवा दक्षिण आफ्रिका या त्रयस्थ देशात होऊ शकते अशी टिप्पणीही पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष नजम सेठी यांनी केली. मात्र या प्रकारच्या कोणत्याही मालिकेचा बीसीसीआयने विचार नसल्याचे प्रत्युत्तर भारतीय बोर्डाकडून देण्यात आले.**

फ्रेंच खुल्या ग्रँडस्लॅम स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात यशस्वी टेनिसपटू असलेल्या राफेल नदालला दुखापतीमुळे यंदा या स्पर्धेतून माघार घेणे भाग पडले आहे. तसेच त्याने पुढील वर्षी निवृत्तीचे संकेतही दिले आहे. फ्रेंच खुल्या स्पर्धेवर नदालची मक्तेदारी असून त्याने तब्बल १४ वेळा ही स्पर्धा जिंकली आहे. तो या स्पर्धेचा गतविजेता आहे. 'लाल मातीचा बादशाह' अशी ओळख असलेल्या नदालला यंदा दुखापतीमुळे आपले जेतेपद राखण्याची संधी मिळणार नाही. नदालला या वर्षी जानेवारीमध्ये ऑस्ट्रेलियन खुल्या स्पर्धेत खेळताना दुखापत झाली होती. त्यातून तो अद्याप सावरू शकलेला नाही. "मला यंदा फ्रेंच खुल्या स्पर्धेत खेळता येणार नाही. ऑस्ट्रेलियात मला जी दुखापत झाली होती, त्यातून मी पूर्णपणे सावरलेलो नाही. गेले चार महिने माझ्यासाठी अवघड होते. करोनानंतर पुन्हा टेनिस सुरू झाल्यापासून मला तंदुरुस्ती प्राप्त करणे अवघड गेले आहे. त्यामुळे मी काही काळ टेनिसपासून दूर राहण्याचा निर्णय घेतला आहे. मी महिन्याभराने पुनरागमन करेन किंवा मला चार महिनेही लागू शकतील. मी तारीख निश्चित केलेली नाही. मी शारिरीकदृष्टय़ा फार ताण घेणार नाही. पुढील वर्ष माझ्या कारकीर्दीतील अखेरचे वर्ष असेल," असे २२ ग्रँडस्लॅम विजेता नदाल गुरुवारी म्हणाला. या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या डेव्हिस चषक स्पर्धेत खेळण्याची आशा असल्याचेही नदालने सांगितले.



### फ्रेंच स्पर्धेच्या आयोजकांकडून संदेश

**फ्रेंच खुल्या स्पर्धेच्या आयोजकांनी समाजमाध्यमावरून नदालला खास संदेश पाठवला. "तुला हा निर्णय घेणे किती अवघड गेले असेल याची आम्ही कल्पनाही करू शकत नाही. यंदाच्या स्पर्धेत आम्हाला तुझी कमी जाणवेल. काळजी घे आणि टेनिस कोर्टवर दमदार पुनरागमन कर. पुढील वर्षी पॅरिसमध्ये तू खेळशील अशी आशा करतो," असे फ्रेंच खुल्या स्पर्धेच्या आयोजकांनी 'ट्वीट' केले.**

### दुखापतीमुळे किरियॉसही मुकणार

**पायाला झालेल्या दुखापतीमुळे निक किरियॉसने आगामी फ्रेंच खुल्या ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेतून माघार घेतली आहे. एका व्यक्तीने बंदुकीचा धाक दाखवत त्याच्या आईला धमकावले आणि त्याची गाडी चोरी केली. यादरम्यान आपल्या कुटुंबाला वाचवताना किरियॉसला दुखापत झाली. या चोरीनंतर एकाला कॅनबरा येथून अटक करण्यात आली. २६व्या मानांकित ऑस्ट्रेलियाच्या किरियॉसने कोर्टवरील सरावाला गेल्या तीन आठवडय़ांपासून सुरुवात केली आहे.**